# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आव्हान म्हणून स्वीकारा : डॉ. चव्हाण



▲ **पाटण,** दि. १७ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी विद्यापीठ आणि महाविद्यालयांना करावीच लागणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत होणारे नवीन बदल आव्हान म्हणून महाविद्या-लयाने स्वीकारले पाहिजेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. आर. के. चव्हाण यांनी केले. पाटण येथील बी. डी. महाविद्यालयात फॅक्टरी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि महाविद्या-लयातील प्रवेश प्रक्रिया याविषयी एक दिवसीय व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते.

प्रा. डॉ. चव्हाण म्हणाले, संपूर्ण देशात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०२४-२५ पासून सुरू झाली असून नवीन अनेक विषय सुरू झाले आहेत. विद्यार्थी, प्राध्यापकांच्या मनात यामुळे संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. मात्र कोणीही गोंधळून न जाता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा ड्राफ्ट आणि विद्यापीठाकडून येणाऱ्या मार्गदर्शक सूचना यांची अंमलबजावणी महाविद्यालयाने केल्यास धोरणाची अंमलबजावणी करण्यात फारशी अडचण महाविद्यालयस्तरावर येणार नाहीत. शिक्षकांबरोबरच विद्यार्थ्यांनाही यामध्ये सामावून घेणे गरजेचे आहे. एकाच वेळी अनेक विद्या शाखांचा व विषयांचा अभ्यास करण्याच्या संधी यामुळे महाविद्यालयांना प्राप्त झाली आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीत काही त्रुटी जरूर आहेत. मात्र त्याची सोडवणूक विद्यापीठ व राज्य सरकार स्तरावर केली जात आहे. त्यामुळे भविष्यात येणारे आव्हान म्हणूनच या शैक्षणिक धोरणाकडे आपण पाहिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी बोलताना प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, महाविद्यालयातील सर्वच घटकांनी या शैक्षणिक धोरणाचा नीट अभ्यास करावा. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी तत्पर राहावे. भविष्यात येणारी आव्हाने सर्वांनी स्वीकारली पाहिजेत. प्रत्येक नवीन गोष्टीला सुरुवातीला काही विरोध होतच असतो. मात्र भविष्यात सर्वांच्याकडून तीच गोष्ट स्वीकारली जाते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अशाप्रकारची व्याख्याने व कार्यक्रम आयोजित करण्याबाबत त्यांनी सांगितले.

समन्वयक आणि नोडल ऑफिसर प्रा. डॉ. पी. वाय. फडणीस यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. सौ. हेमलता काटे यांनी आभार मानले. कार्यक्रमास वरिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.